प्रेसनोट

जा.क्र. ११/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांकः—०४/०१/२०१७

# राज्यस्तरीय पोलीस क्रिडा स्पर्धाकरिता भंडारा हॅन्डबॉल व हॉकी संघ रवाना —०परीक्षेत्रीय स्पर्धेत हॅन्डबॉल अव्वल०—

**भंडारा** :— चंद्रपूर येथे नुकत्याच पार पडलेल्या नागपूर परीक्षेत्रीय पोलीस क्रिडा स्पर्धामध्ये भंडारा जिल्हा पोलीस दलाच्या चमूंनी चमकदार कामगीरी दाखवत जिल्हयाची विजयी घोडदौड कायम राखली. त्यानुषंगाने सदर विजयी चमुंना सरावाकरिता भंडारा जिल्हा पोलीस मुख्यालयात ठेवण्यात आले होते. त्यांचा सराव पूर्ण झालेला असून सदर संघ राज्यस्तरीय पोलीस क्रिडा स्पर्धाकरिता औरंगाबाद येथे उद्याला दि. ०४/०१/२०१७ रोजी रवाना होंणार आहे.

चंद्रपूर येथे पार पडलेल्या नागपूर परीक्षेत्रीय पोलीस क्रिडा स्पर्धामध्ये भंडारा जिल्हा पोलीस दलाच्या हॅन्डबॉल संघाने प्रथम क्रमांक तर हॉकी संघाने व्दितीय क्रमांक पटकाविला आहे. तसेच महिला संघाने खो — खो खेळामध्ये व्दितीय क्रमांक पटकाविला आहे.

तसेच भंडारा पोलीस बॅन्ड पथकानेही प्रथम क्रमांक पटकावला असुन हे सर्व संघ राज्यस्तरीय पोलीस क्रिडा स्पर्धा, औरंगाबाद येथे भाग घेण्यासाठी रवाना होत आहेत.

औरंगाबाद येथील राज्यस्तरीय क्रिडा स्पर्धाकरीता सहभागही होणाऱ्या हॅन्डबाल व कुस्ती खेळाडुंचे सराव शिबिर नुकतेच भंडारा जिल्हा पोलीस मुख्यालय येथे पार पडले. सदर संघातील खेळाडुंचे मनोबल उंचावावे व आत्मविश्वास वाढावा याकरीता मा. पोलीस अधीक्षक विनीता साहु यांचे वतीने आज दि ०३/०१/२०१७ रोजी त्यांना आदर्श टॉकीज, भंडारा येथील 'दंगल' या चित्रपटाचे खास प्रदर्शन आयोजीत करण्यात आले होते. सदर सर्व संघातील खेळाडूंचे पोलीस अधीक्षक, भंडारा श्रीमती विनीता साहू यांनी कौतुक केले असुन, त्यांना 'शुभेच्छा दिल्या'.

(बी. आर. गाडे)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र. ८८०५१०१११२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता